# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४० वी बैठक

**दिनांक :** **२८ नोव्हेंबर, २०१३ (गुरुवार)**

**वेळ :** **सकाळी ११.३० वाजता**

**स्थळ :** **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**सहावा मजला, मंत्रालय**
**मुंबई - ४०० ०३२.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. जयन्त कुमार बाँठिया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना.वि.मिराणी | - | सदस्य |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एस. सी. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक,
(नगर नियोजन), माहिती व तंत्रज्ञान विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. उ. गं. भार्गव
सचिव, कार्यकारी समिती (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करताना खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.१८ : श्री. एन व्ही. मिराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी सादर केलेली कार्यकारी समितीच्या कामकाजासंबंधी मुद्देसुद टिप्पणी व त्यावरील प्राधिकरणाचे शेरे/अभिप्राय.**

श्री. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली की, प्राधिकरणाच्या चालू असलेल्या प्रकल्पांवर पहाणी करण्याकरिता योग्य अशा वरीष्ठ बांधकाम सुरक्षा अभियंत्यांची नेमणूक करण्यात यावी.

सदर सुचनेस मान्यता देऊन कार्यकारी समितीचे कार्यवृत्त कायम केले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील विषयावर चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील (जी ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नत मार्ग बांधण्याच्या कामासाठी व व्हि. एन. पुरव मार्गावरील चुनाभट्टी येथील रेल्वे क्रॉसिंगच्या जागी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याच्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

या विषयावर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, जर ४ (२ + २) मार्गिकांच्या ऐवजी ६ (३ + ३) मार्गिकांचा उड्डाणपूल करता येईल काय ? यावर प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, सदर उड्डाणपूलावर ६ (३ + ३) मार्गिका करता येणे शक्य होणार नाही.

**बाब क्र.१७ : श्रीमती रोहिणी रविंद्र तोडणकर यांची प्राधिकरणाच्या सेवेत शिपाई पदावर कायमस्वरुपी नेमणूक करणेबाबत.**

या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी श्रीमती तोडणकर यांना विशेष बाब म्हणून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सामावून घेण्याची विनंती केली.

यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : पूर्व मुक्त मार्ग (भाग-१) - प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय ते आणिक जंक्शन या कामाच्या सुधारित खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, दिनांक २ ऑगस्ट, २०११ रोजीच्या कार्यकारी समितीच्या २३२व्या बैठकीमध्ये, सुधारीत आराखडयामुळे झालेल्या प्रकल्पाच्या रु.७४९.८९४ कोटी इतक्या सुधारीत किंमतीस मान्यता देण्यात आलेली होती. तथापी, प्रकल्प प्रगती पथावर असताना काही बाबींमध्ये घट व वाढ झालेली आहे.

त्या अनुषंगाने प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीस मान्यता देण्यासंबंधीचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. या संबंधी कारणांचे विवेचन बाब टिप्पणीमध्ये व त्यासोबतच्या जोडपत्र - १ मध्ये करण्यात आलेले आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीमध्ये होत असलेली वाढ ही मुख्यत्वे कंत्राटीय तरतुदीनुसार दयावयाची भाववाढ व माहुल खाडीवरील दोन पुलांचा लगतच्या आणिक पांजरपोळ जोडरस्ता या कामातून वगळून पूर्व मुक्त मार्गाच्या कामामध्ये समावेश केल्यामुळे आहे. तसेच याव्यतिरिक्त मेसंट मार्गावरील पूर्व मुक्त मार्गाच्या आखणीमध्ये करावा लागलेल्या बदलामुळे कामामध्ये झालेली वाढ, मिठागर क्षेत्रातून जाणा-या रस्त्यासाठी अस्तित्वातील दलदल जमिनीचे मजबुतीकरण करणे, पथदिव्यांचे काम व त्यासाठी वीजपुरवठा करणे, पी. डिमेलो रोड वरील रॅम्पच्या कामात अडथळा होत असलेल्या पर्जन्यवाहिन्या हलविणे, सी.सी. टी.व्ही. कॅमेरे व स्पीडगन बसविणे इत्यादी कामांसाठी मुंबई महानगरपालिका / बेस्ट / मुंबई पोर्ट ट्रस्ट/ वाहतूक पोलीस यांना अदा करण्यात आलेली / येत असलेली रक्कम आणि कंत्राटदाराच्या दोषदायित्वाबाहेरील कारणांमुळे करावी लागणारी पूर्व मुक्त मार्गाची देखभाल व दृश्य रोधकाची अतिरिक्त लांबीमध्ये करावी लागणारी उभारणी इत्यादी कारणांमुळे खर्चामध्ये होत असलेली एकूण वाढ रु.१४५.४४८ कोटी इतकी आहे. त्याचप्रमाणे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या भुजामार्गिका, दुभाजकाच्या प्रकारामध्ये केलेला बदल, प्रत्यक्ष कामाप्रमाणे कमी झालेली पाईलची खोली, उच्च दाबांच्या टाटा पॉवरच्या विद्युतवाहिन्यांची उंची वाढविण्याच्या कामामध्ये कमी झालेला प्रत्यक्ष खर्च इ. बाबींमुळे रु.२६.३३३ कोटी इतकी घट झाली आहे.

३.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही विषद केले की, उपरोक्त विवेचनानुसार सुधारीत खर्चामध्ये होत असलेली निव्वळ वाढ रु.११९.११५ कोटी इतकी आहे. त्याचबरोबर पूर्व मुक्त मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी लागत असलेल्या अतिरिक्त कालावधीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना कंत्राटीय तरतूदीप्रमाणे रु.१.८५ कोटी इतकी वाढीव रक्कम देय आहे, त्यासाठी ही मान्यता आवश्यक आहे.

३.४ उपरोक्त विषयासंबंधी झालेल्या चर्चेत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी भाववाढीची वाढीव रक्कम कोणत्या आधारे ठरविली असे विचारले असता, मुख्य अभियंता यांनी सदर वाढीव रक्कम ही करारनाम्यामध्ये नमूद असलेल्या सुत्रानुसार ठरविण्यात आलेली आहे असे सांगितले. यापुर्वी कार्यकारी समितीच्या दिनांक २ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या २३२व्या बैठकीमध्ये ही भाववाढ १४% या दराने अंदाजित करण्यात आली होती. तथापी, सद्य:स्थितीत ती ३३% इतकी होत आहे, त्यामुळे भाववाढीपोटी अधिक्य होत आहे.

३.५ या विषयावर, कार्यकारी समितीचे सदस्य श्री.एन.व्ही. मिराणी व श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची वाढीव रक्कम कोणत्या आधारे ठरविण्यात आली असे विचारले. त्यास मुख्य अभियंता यांनी या कामासाठी वाढलेल्या अतिरिक्त कालावधीसाठी सल्लागार जबाबदार नाही असे दिसून येते व त्यांचे शुल्कापोटी वाढीव रक्कम ही सल्लागाराशी केलेल्या करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या तरतूदी देण्यात येणार आहे असे सांगितले.

३.६ श्री. द.म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पूर्व मुक्त मार्गावर कोणत्या ठिकाणी प्रवेश व निकास प्रस्तावित असून सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे असे विचारले. मुख्य अभियंता यांनी पी. डिमेलो रोड, मुंबई पोर्ट ट्रस्ट हद्दीत व मिठागर क्षेत्रात प्रत्येकी दोन रॅम्पस् असून भक्ती पार्क जवळील माहुल खाडीवर प्रवेश व निकासासाठी दोन पूल असल्याची माहिती देऊन प्रगती पथावरील कामे मे, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे असे सांगितले.

३.७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १२४५ :</u>**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, "पूर्व मुक्त मार्ग (भाग - १) प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय ते आणिक जंक्शन पर्यंत उन्नत मार्ग तयार करणे" या प्रकल्पाच्या सुधारीत खर्चास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणारे संभाव्य आर्थिक अधिदान खालीलप्रमाणे करण्यास मान्यता देत आहे :-

**१)** "पूर्व मुक्त मार्ग (भाग - १) प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय ते आणिक जंक्शन पर्यंत उन्नत मार्ग तयार करणे" या प्रकल्पाच्या एकूण रु.८६९.००८ कोटी इतक्या सुधारीत किंमतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**२)** "पूर्व मुक्त मार्ग (भाग - १) प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय ते आणिक जंक्शन पर्यंत उन्नत मार्ग तयार करणे" या प्रकल्पाशी संलग्न असलेल्या माहुल खाडीवरील दोन पुलांचे काम लगतच्या आणिक पांजरपोळ जोडरस्ता या कामाच्या कंत्राटामधून वगळून मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हे कंत्राटदार असलेल्या पूर्व मुक्त मार्ग (भाग -१) च्या कामामध्ये समाविष्ट करण्याच्या कार्यवाहीस आणि त्या अनुषंगाने व इतर उल्लेखित कारणास्तव झालेल्या रु.८३८.५५८ कोटी इतक्या सुधारीत कंत्राटीय किंमतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना फी च्या स्वरुपात एकूण रु.१७.५९१ कोटी एवढी एकूण रक्कम अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : प्राधिकरणाच्या नविन कार्यालयीन इमारतीसाठी अंतर्गत सजावट, मॉडयुलर फर्निचर व उर्वरित स्थापत्य कामाच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या २३५ व्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे कार्यालयीन इमारतीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने विद्युत व वातानुकुलित कामासाठी एक आणि अंतर्गत सजावटीच्या कामासाठी एक अशा दोन स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या असे सांगितले. त्यातील अंतर्गत सजावट, मॉडयुलर फर्निचर व उर्वरित स्थापत्य कामाची अंदाजित किंमत रु.२०.७७ कोटी इतकी असून कामाचा कालावधी ८ महिने इतका आहे व सदर कामाची ब-१ प्रकारची निविदा सुचना दिनांक ३० जुलै, २०१३ रोजी वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली. त्यास प्रतिसाद देऊन ८ निविदाकारांनी निविदा प्रती खरेदी केल्या व ४ निविदाकारांनी आपल्या निविदा दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ रोजी सादर केल्या होत्या.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे निविदेतील अटी, शर्ती व अर्हता निकष इत्यादी बाबींची छाननी करण्यासाठी अधिक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय तांत्रिक समिती गठीत करुन प्राप्त निविदेतील अटी व अर्हता निकष इत्यादी बाबींची छाननी केल्यानंतर ३ निविदाकारांच्या निविदा अप्रतिसादात्मक (Non-responsive) असल्याचे निर्दशनास आले. मे.गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची निविदा सर्व अटी व अर्हता निकष इत्यादी बाबी पूर्ण करत असल्यामुळे मे.गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांचा आर्थिक देकाराचा लिफाफा दिनांक १३ ऑक्टोबर, २०१३ रोजी उघडण्यात आला व त्यानुसार मे.गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १०% कमी दराची आहे असे आढळले व त्यानंतर सदर निविदा ही प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या छाननी व शिफारशीकरिता सादर करण्यात आली. निविदा समितीने निविदेतील अटी व अर्हता निकष व तांत्रिक समितीचा अहवाल तपासून तसेच इमारत लवकरात लवकर वापरास योग्य करण्याच्या दृष्टीने मे. गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% कमी किंमतीची निविदा मान्य करण्याची शिफारस केलेली आहे असे महानगर आयुक्त यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

४.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या कामासाठी ४ निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केलेल्या असल्याने व त्यापैकी मे.गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची प्रतिसादात्मक निविदा १०% कमी दराची असल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले आहेत असे दिसून येते.

४.४ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी लिफाफा क्र.१ (तांत्रिक) व लिफाफा क्र.२ (आर्थिक) हे एकत्र मागविण्यात आले होते किंवा कसे अशी विचारणा केली त्यावर मुख्य अभियंता यांनी सदर दोन्ही लिफाफे एकत्र एकाच वेळी मागविण्यात आले होते असे सांगितले.

४.५ सदर प्रकल्पाकरिता मूळ प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाने दिली असल्याने प्रकल्पाच्या सुधारित किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून घेणे उचित होईल असे मत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी व्यक्त केले. त्यानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

४.६ चर्चेअंती, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करता मे. गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १०% कमी दराची आहे याची नोंद घेऊन त्यांच्या सोबत दराबाबत वाटाघाटी करुन महानगर आयुक्त यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा असे निर्देशित केले. त्यानुसार खालील ठराव मंजूर केला.

**<u>ठराव क्र. १२४६ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे प्राधिकरणाच्या नविन कार्यालयीन इमारतीच्या अंतर्गत सजावट, मॉडयुलर फर्निचर इ. कामाकरिता मे. गोदरेज ॲन्ड बॉइस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% कमी दराची म्हणजेच रु. १८,६९,७५,०००/- वा त्यापेक्षा कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास व दराबाबत वाटाघाटी करुन महानगर आयुक्त यांच्या स्तरावर अंतिम निर्णय घेण्याच्या व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीं प्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर मान्यता प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहील.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.५ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या नविन कार्यालयीन इमारतीसाठी अग्निसूचक यंत्रणा व्ही.आर.व्ही प्रकारची वातानुकूलित यंत्रणा आवश्यक त्या बिल्डिंग ॲटोमेशनसह विद्युत संच मांडणीची उभारणी करणे या कामाच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.</u>**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या २३५ व्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे कार्यालयीन इमारतीचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने विद्युत व वातानुकुलित कामासाठी एक आणि अंतर्गत सजावटीच्या कामासाठी एक अशा दोन स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत अग्निसुचक यंत्रणा, व्ही.आर.व्ही प्रकारची वातानुकुलित यंत्रणा आवश्यक त्या बिल्डिंग ॲटोमेशनसह विद्युत संच मांडणीची उभारणी करणे या कामाची अंदाजित किंमत रु.१७.२० कोटी इतकी असून कामाचा कालावधी ८ महिने इतका आहे व सदर कामाची "ब-१" प्रकारच्या दिनांक २९ मे, २०१३ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सूचनेस प्रतिसाद देऊन ९ निविदाकारांनी निविदा प्रती खरेदी केल्या व ४ निविदाकारांनी आपल्या निविदा दिनांक ०५ ऑगस्ट, २०१३ रोजी सादर केल्या होत्या.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदेतील अटी, शर्ती व अर्हता निकष इ. बाबींची छाननी करण्यासाठी अधिक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती व त्याप्रमाणे प्राप्त निविदेतील अटी व अर्हता निकष इत्यादी बाबींची छाननी तांत्रिक समिती मार्फत करण्यात आली व सर्व निविदाकारांच्या निविदा प्रतिसादात्मक (Responsive) असल्याचे तांत्रिक छाननी समितीच्या निदर्शनास आल्याने सर्व निविदाकारांचा आर्थिक देकाराचा लिफाफा दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी उघडण्यात आला असता मे. प्रविण इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ८% कमी दराची लघुत्तम निविदा प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या छाननी व शिफारशीकरीता सादर करण्यात आली. निविदा समितीने निविदेतील अटी व अर्हता निकष व तांत्रिक समितीचा अहवाल तपासून तसेच इमारत लवकरात लवकर वापरास योग्य करण्याच्या दृष्टीने हे काम लवकर पूर्ण होणे आवश्यक असल्याने मे. प्रविण इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. यांची अंदाजपत्रकापेक्षा ८% कमी किंमतीची निविदा मान्य करण्याची शिफारस केलेली आहे, असे महानगर आयुक्त यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

५.३ श्री. ना. वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विद्युत कामांच्या बाबीचा विचार करता सदर प्राप्त दर हे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने वाजवी आहेत किंवा कसे याबाबत मुख्य अभियंता, (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून अभिप्राय घेऊन निविदा मंजूरीबाबत पुढील योग्य ती विहित कार्यवाही करण्यात यावी असे सुचविले. तसेच श्री. ना. वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी

समिती यांनी असेही सूचित केले की, कार्यकारी समितीच्या २३५व्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे, सदर प्रकल्पाकरिता मूळ प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाने दिली असल्याने प्रकल्पाच्या सुधारित किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून घेणे उचित होईल असे मत व्यक्त केले. त्यानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

५.४ चर्चेअंती, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करता मे. प्रविण इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. यांची निविदा स्विकारण्याबाबतची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत केले, तसेच याबाबतची कार्यवाही मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अभिप्रायानंतर करावे असे आदेशित केले.

५.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १२४७ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे प्राधिकरणाच्या नविन कार्यालयीन इमारतीच्या अग्निसुचक यंत्रणा, व्ही.आर.व्ही प्रकारची वातानुकूलित यंत्रणा आवश्यक त्या बिल्डिंग ॲटोमेशनसह विद्युत संच मांडणी करणे इ. कामाकरिता मे. प्रविण इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. यांची अंदाजपत्रकापेक्षा ८.००% कमी दराची म्हणजेच रु.१५,८२,६४,५४४/- रक्कमेची निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर मान्यता प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहील.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u>** **<u>मुंबई महानगर प्रदेशामध्ये वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत मे.सीबीए लँडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी रोपे पुरवठा केलेल्या कामास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.</u>**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या १२७व्या बैठकीतील ठरावानुसार

मुंबई महानगर प्रदेशामध्ये सुमारे १ कोटी वृक्षाची लागवड करण्याच्या दृष्टीने सन २०११-१२ करीता रु. ३९.१८ कोटी व सन २०१२-१३ या वर्षाकरीता रु १ कोटी इतक्या निधीची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाला गती देण्याच्या दृष्टीने तसेच सन २०१० या वर्षाचा पावसाळी हंगाम संपत आल्यामुळे झाडांची रोपे त्वरित उपलब्ध करुन घेणे तसेच ती शासकीय / निमशासकीय संस्था, अशासकीय संस्था इत्यादीकडे लागवडीसाठी पुरवठा करणे आवश्यक होते. त्याच दरम्यान प्राधिकरणामार्फत गोराई येथील मॅनग्रोव्ह क्षेत्रात विविध वृक्षलागवडीसंदर्भात निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर मान्यता प्राप्त निविदेत रोपांची लागवड व त्यांच्या तीन वर्षाच्या देखभालीकरिता प्रति रु १२१३/- इतका दर नमुद होता. यासंदर्भात अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी मे.सी. बी.ए.लॅंडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांच्या समवेत चर्चा करुन साधारणतः ३ ते ५ फूट उंचीच्या विविध जातींची रोपे रक्कम रु.५०/- या दराने पुरवठा करण्याचे मान्य केले. मे. सी.बी.ए.लॅंडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांना चालू पावसाळी हंगामात एकूण सुमारे १ लाख रोपे पुरवठा करण्याचे कार्यारंभ आदेश दिले.

६.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मे. सी.बी.ए.लॅंडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांनी प्राधिकरणाने मागणी केल्यानुसार शासकीय, निमशासकीय इ. संस्थांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१० ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० दरम्यान एकूण १,१०,९६० रोपांचा पुरवठा केला आहे. स्पोर्टस् ॲथॉरीटी ऑफ इंडिया या संस्थेने त्यांना पुरवठा केलेल्या एकूण १८,२७० रोपांपैकी ९५% रोपे जगलेली असल्याचा अहवाल दिलेला आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांनी त्यांना पुरवठा केलेल्या एकूण ७७,८४० रोपांच्या लागवडीचा अहवाल दिलेला आहे. जिजामाता उद्यान यांनी देखील त्यांना प्राप्त झालेली एकूण १०,२१० रोपे बृहन्मुंबई महापालिकेच्या विविध प्रभागामध्ये वितरीत करण्यात आल्याचे कळविले आहे.

६.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, पुरवठा केलेल्या रोपांसाठी रू. ५०/- प्रती रोप हा दर कसा ठरविला? यावर महानगर आयुक्त यांना सांगितले की, सदर दर मे. सी. बी.ए.लॅंडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांचेशी तत्कालीन अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी प्रत्यक्ष वाटाघाटी करून ठरविले असल्याचे नमूद केले.

६.४ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, सामाजिक वनीकरण खात्याच्या सन २०१०-११ मधील रोपाचा दर मागविण्यात यावा. तो दर जर प्रस्तावित दरापेक्षा कमी असल्यास सामाजिक वनीकरण खात्याने मंजूर केलेल्या दराने मे. सी. बी.ए.लॅंडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांना देयक अदा करण्यात यावे.

६.५ त्यानंतर, उपरोक्त सूचनेस अधिन राहून कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १२४८:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत मे. सी.बी.ए. लँडस्केप इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी वृक्ष लागवडीकरिता पुरवठा केलेल्या १,१०,९६० रोपांकरिता त्यांची किंमत, वाहतूक व मजुरीवरील खर्चास व रोपांच्या दराबाबत सामाजिक वनीकरण विभागाने २०१०-११ चे मंजूर केलेले दर प्राप्त करुन त्यानुसार रक्कम अदा करण्याचा अंतिम निर्णय घेण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेशात प्राधिकरणातर्फे उभारण्यात येणा-या तळोजा येथील प्रादेशिक एकात्मिक घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पास स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राधिकरणातर्फे अर्थ सहाय्य देण्याबाबत.</u>**

७.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगीतले कि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तळोजा येथील प्रादेशिक एकात्मिक नागरी घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यकारी समितीच्या दिनांक ४ मे, २०१३ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त केल्यानंतर दिनांक ५ जुलै, २०१३ रोजी यशस्वी निविदाकार मेसर्स रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड कन्सोर्टियम या प्रवर्तकास कार्यालयीन आदेश (LOA) दिलेला असून त्यांचे समवेत "सवलत-करारनामा" करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कार्यालयीन आदेशाची विधिग्राहयता (Validity) दिनांक १५ डिसेंबर, २०१३ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. प्राधिकरणाने दिनांक २ जानेवारी, २०१३, २४ मे, २०१३ व २५ जुलै, २०१३ हया पत्रांव्दारे शासनाच्या नगर विकास विभागास हा प्रकल्प अधिसूचित करून सहभागी होणाऱ्या ६ स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर या महानगरपालिका व अंबरनाथ आणि कुळगांव-बदलापूर या नगरपरिषदांना महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, दिनांक २० डिसेंबर, २०१२च्या तरतूदीनुसार निर्देश देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. परंतु शासनाकडून अद्यापपर्यंत निर्देश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहभागाबाबत खात्री होत नाही, तोपर्यंत प्राधिकरणाकडून प्रकल्पाबाबतची पुढील कार्यवाही करणे शक्य होणार नाही. तसेच ठाणे महानगरपालिकेने सहभाग काढून घेतल्यानंतर सिडकोने सहभागी होण्यास तत्वतः सहमती कळविली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका, पनवेल नगरपरिषद, नवी मुंबई महानगरपालिका हे

तळोजा येथील प्रकल्पात सहभागी होण्यास इच्छूक आहेत. त्यामुळे ठाणे महानगरपालिका सहभागी झाली नाही तरी प्रकल्पाची उभारणी करणे शक्य होणार आहे.

७.२ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे नमूद केले की, ठाणे महानगर पालिकेने सहभागी होण्यास प्राधिकरणास एकदा सहमती दिल्यानंतर सहभागी न होण्याचे उचलेले पाऊल योग्य नाही. परंतु त्यांनी भविष्यात सहमती दर्शविल्यास त्यांना हया प्रकल्पात सामावून घेण्यास प्राधिकरणास हरकत नसावी.

७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, हा प्रकल्प पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने व हया प्रकल्पात पर्यावरणाचे सर्व निकष पाळण्यात येणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा कचरा विल्हेवाटीचा जटिल प्रश्न कायमचा सुटणार असल्याने प्राधिकरणाकडून प्रादेशिक पायाभूत विकास सुविधा म्हणून राबवीत असलेल्या इतर उपक्रमाबरोबरच या प्रकल्पासाठी रु. २५५ कोटी एन. पी. व्ही. (NPV) पोटी येणारी रक्कम (वार्षिक रुपये ३३ कोटी) पुढील २३ वर्षांसाठी खर्च करणे संयुक्तिक वाटते.

७.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती हयांनी असे मत व्यक्त केले की, प्रादेशिक एकात्मिक घन कचरा व्यवस्थापन सुविधा हा महत्वांकाक्षी प्रकल्प तयार झाल्यानंतर व प्रचलनास सुरुवात झाल्यावर सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांनादेखील त्याचा फायदा होऊ शकेल.

७.५ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी तळोजा येथील सामाईक भरावभूमी प्रकल्पासाठी “टिपिंग फी” चा दर रास्त आहे किंवा कसे असा मुद्दा उपस्थित केला असता, महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणाने पारदर्शकरित्या निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यकारी समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२, २८ जानेवारी, २०१३ व दिनांक ४ मे, २०१३ रोजीच्या सभेत याबाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाच्या प्रस्तावास मान्यता दिली होती व त्यामुळे टिपिंग फीच्या दराबाबतचा मुद्दा आता उपस्थित करणे संयुक्तिक होणार नाही. पुढे त्यांनी असा ही खुलासा केला की, प्राधिकरणाच्या टिपिंग फीचा दर जरी प्रथमतः जास्त वाटत असला तरी प्रकल्पाच्या कालावधीमध्ये टिपिंग फी मधील फक्त अस्थिर घटकच वाढणार असल्याने एकंदरीत या प्रकल्पाचा टिपिंग फीचा दर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एंकदरीत कालावधीच्या टिपींग फीचे दर तुलनात्मक दृष्टया अत्यंत किफायतशीर राहणार आहे व अशा प्रकारची तक्तानिहाय माहिती मे. केपीएमजी व्यावसायिक सल्लागारानी दिली आहे. महानगर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, बाब टिप्पणीच्या जोडपत्रातील तक्त्यात दर्शविलेल्या

"टिपिंग फी" मध्ये "स्थिर घटक" व "अस्थिर घटक" असून त्यातील "स्थिर घटकानुसार" येणाऱ्या अंदाजे प्रती वर्षी रु. ३३ कोटी रक्कमेनुसार एन. पी. व्ही. (NPV) पोटी येणारी रक्कम रु. २५५ कोटी ही आहे व त्याचा भार प्राधिकरणाने घ्यावयाचा आहे व त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही, तर "अस्थिर घटकानुसार" येणाऱ्या रक्कमेचा भार स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभागातून त्यांच्या कचऱ्याच्या प्रमाणात उचलावयाचा आहे व त्याची प्रती वर्षी WPI वर आधारित रक्कम वाढत जाणार आहे. प्राधिकरणाने जर टिपींग फी मधील स्थिर घटकाची रक्कम देण्यास हातभार लावला तर स्थानिक स्वराज्य संस्थांना अस्थिर घटकाच्याच रक्कमेचा आर्थिक भार म्हणून सोसावा लागेल, परंतु यामुळे त्यांचा कचरा विल्हेवाटीचा जटील प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे व त्यामुळे शासनाने अधिसुचनेप्रमाणे या स्थानिक संस्थांना निर्देश द्यावेत, जेणे करुन प्राधिकरणाचा हा प्रकल्प यशस्वी होऊ शकेल.

७.६. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, शासनाकडून सहभागी होण्यास निर्देश दिल्यानंतर सहभागी होणाऱ्या ६ स्थानिक स्वराज्य संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे. त्यातील २ नगरपरिषदांनी आपल्या सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त करुन सहभागी होण्यास अगोदरच सहमती दिलेली आहे. त्यामुळे ४ महानगरपालिकांना म्हणजेच ठाणे, भिंवडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर हयांना शासनाकडून निर्देश देणे अपेक्षित आहे. हया ६ स्थानिक स्वराज्य संस्थांव्यतिरिक्त जसे की, सिडको अथवा इतर संस्था सहभागी झाल्यास त्यांना अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय योग्यवेळी घेण्यात येईल.

७.७ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी तळोजा येथील एकात्मिक घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प हा मोठया भांडवली खर्चाचा प्रकल्प असून स्वतंत्रपणे अशा प्रकल्पाची उभारणी करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना कदापिही शक्य होणार नाही, असे मत व्यक्त केले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना अत्यंत हितावह व पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या प्राधिकरणाच्या हया प्रकल्पास शासनाकडून व प्राधिकरणाकडून मुंबई महानगर प्रदेशाचे महाराष्ट्रातील स्थान बघता व प्राधिकरणाची जबाबदारी पहाता या महत्वाकांक्षी प्रकल्पास चालना व पाठबळ मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

७.८ चर्चेअंती, कार्यकारी समितीने खालील शिफारशी केल्या :-

(अ) तळोजा प्रकल्पात सहभागी होणाऱ्या वर उल्लेखलेल्या ४ महानगरपालिकांना सहभागी होण्याबाबत तसेच तळोजा प्रकल्प अधिसुचित करण्यास, दिनांक २० डिसेंबर, २०१२च्या अधिनियमातील तरतूदीनुसार बंधनकारक करण्यासाठी नगर विकास विभागाकडून निर्देश देण्याची कार्यवाही व्हावी.

(ब) नगर विकास विभागाने निर्देश निर्गमित केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून येणाऱ्या प्रतिसादानुसार टिपींग फीमधील अर्थसहाय्य देण्याबाबतचा विचार व्हावा.

७.९ त्यानंतर, कार्यकारी समितीने सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

**बाब क्र.८ : भिवंडी वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिवंडी येथील उड्डाणपुलास अतिरिक्त मार्गिका देण्याच्या वाढीव कामास व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरच्या प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील पायाभुत सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमध्ये भिवंडी वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिवंडी येथील साखळी क्र.०/२०० ते ०/९५० दरम्यान दोन पदरी उडडाणपूलाचे बांधकाम करण्याच्या कामाचा समावेश आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु.३५.९६ कोटी इतकी आहे.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, भिवंडी येथील भिवंडी वाडा रस्ता व भिवंडी ते रा.मा.क्र.३ जोडणारा रस्ता या रस्त्यांना जोडणारे वंजारपटटी मुख्य चौकाचे ठिकाण आहे. या परीसरातील मोठया प्रमाणातील उद्योगधंदे व गोदामे यामुळे चौकाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूकीची कोंडी होते. या ठिकाणी उडडाणपूल बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी होती. या परीसरातील वाहतूकीचा अभ्यास करण्यासाठी प्राधिकरणातर्फे मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कंन्सल्टंटस यांची नेमणूक करण्यात आली. सल्लागाराने परीसरातील वाहतूकीचा अभ्यास करुन वंजारपटटी येथे भिवंडी ते वाडा या दिशेवर दु-पदरी उडडाणपुल बांधण्याची शिफारस केली. यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे जिल्हा यांचे सन २०१०-११ चे मंजुर दरसुचीवर आधारीत अंदाजपत्रक बनविण्यात आले. या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.३१.५९ कोटी इतक्या रक्कमेस ठोक स्वरुपाच्या निविदा दिनांक ७ ऑगस्ट, २०११ रोजी मागविण्यात आल्या. प्राप्त निविदांमधील लघुत्तम निविदाकार मे. जे.एम.सी. प्रोजेक्ट्स (इं.) लि. यांची रु.२५.२० कोटीची निविदा कार्यकारी समितीने दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या २३३ व्या बैठकीत ठराव क्र.११९० अन्वये मंजुर केली. त्यानुसार दिनांक ९ मार्च, २०१२ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देऊन कामास सुरुवात करण्यात आली. तथापी, सुरुवातीच्या काळात उड्डाणपुलाच्या कामाच्या ठिकाणी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत भुयारी गटारमार्गाचे काम सुरु असल्याने उड्डाणपुलाच्या कामास अपेक्षित वेग घेण्यात आला नाही. सदर भुयारी गटारमार्गाचे काम मार्च, २०१३ च्या सुमारास पुर्ण झाल्यानंतर आजमितीपर्यंत उड्डाणपुलाचे सुमारे ५०% काम पुर्ण झाले आहे.

८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर कामाअंतर्गत भिवंडी वाडा रस्त्यावर भिवंडी ते वाडा दिशेने ७५० मी. लांबीचा व ८.५० मी. रुंदीचा दु-पदरी उड्डाणपुल बांधण्यात येत आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे महापौर यांनी महानगर आयुक्त यांची दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजी भेट घेऊन उड्डाणपुलाच्या आराखडयात पुढील कामे समाविष्ट करण्याची विनंती केली :-

अ) उड्डाणपुलास शिवाजी चौककडे जाणेसाठी स्वतंत्र मार्गिका देणे.

ब) उड्डाणपुलास नाशिक हायवेकडे जाणेसाठी स्वतंत्र मार्गिका देणे.

क) उड्डाणपुलाचा कामावरी नदी पार करुन शेलार गावापर्यंत विस्तार करणे.

तथापि, महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावांना भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महासभेची मंजुरी मिळाल्यास यावर विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले. भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महासभेने त्यांच्या दिनांक ०४ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत वरील कामांचा वंजारपट्टी येथील प्रगतीपथावर असलेल्या उड्डाणपुलाच्या कामात समावेश करण्याचा ठराव एकमताने संमत करुन प्राधिकरणाकडे कार्यवाहीसाठी पाठविला. या अनुषंगाने सल्लागारांना वरील कामांची उपयुक्तता तपासण्यासाठी कळविण्यात आले. सल्लागाराने वाहतूक परिस्थितीचा अभ्यास करुन वरील प्रस्तावांचे अभिप्राय व ढोबळ अंदाजखर्च प्राधिकरणास कळविला. सदर अभिप्राय मंजुरीकरीता सादर केले असता, महानगर आयुक्त यांनी वरील ३ मागण्यांपैकी (अ) व (ब) नुसार स्वतंत्र मार्गिका देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार, सल्लागारांस या प्रस्तावांचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक सादर करण्यास कळविण्यात आले. सल्लागारांने सादर केलेल्या आराखडयानुसार या वाढीव कामांची माहिती महानगर आयुक्त यांनी पुढील प्रमाणे सादर केली;

**अ) उड्डाणपुलास शिवाजी चौकाकडे जाणेसाठी स्वतंत्र मार्गिका देणे.**

वंजारपट्टी येथे भिवंडी वाडा रस्ता व नाशिक महामार्गाकडे जाणारा रस्ता मिळत असल्याने येथे अवजड तसेच लहान वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असून सध्या प्रगतीपथावर असलेला उड्डाणपुल भिवंडी ते वाडा या दिशेकडील वाहतुकीस उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे वाडा ते नाशिक महामार्ग या दिशेच्या प्रवासाची वाहने उड्डाणपुलाच्या खालूनच वाहतुक करणार आहेत व यामुळे बाहेरगावची अवजड वाहनांची वाहतुक व शहराअंतर्गत असणारी इतर वाहतुक यांची चौकाच्या ठिकाणी सरमिसळ होणार आहे. त्यामुळे शिवाजी चौकाच्या दिशेने स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाल्यास शहराअंतर्गत वाहतुक करणारी या दिशेकडील वाहने उड्डाणपुलाच्या स्वतंत्र मार्गिकेचा वापर करुन केल्याने पुलाखालील चौकामध्ये होणारी वाहतूक कोंडी कमी होईल.

या मार्गिकेची लांबी ३१८ मी. इतकी असून रुंदी ५.० मी. इतकी आहे. या कामासाठी रु.१०.६६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) उड्डाणपुलास नाशिक हायवेकडे जाणेसाठी स्वतंत्र मार्गिका देणे.**

वंजारपट्टी येथे भिवंडी वाडा रस्ता व नाशिक महामार्गाकडे जाणारा रस्ता मिळत असल्याने येथे अवजड तसेच लहान वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असून सध्या प्रगतीपथावर असलेला उड्डाणपुल भिवंडी ते वाडा या दिशेकडील वाहतुकीस उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे वाडा ते नाशिक महामार्ग या दिशेच्या प्रवासाची वाहने उड्डाणपुलाच्या खालुनच वाहतुक करणार आहेत व यामुळे बाहेरगावची अवजड वाहनांची वाहतुक व शहराअंतर्गत असणारी इतर वाहतुक यांची चौकाच्या ठिकाणी सरमिसळ होणार आहे. त्यामुळे नाशिक महामार्गाच्या दिशेने स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाल्यास अवजड वाहतूक उड्डाणपुलाचा वापर करुन खालील चौकाचे ठिकाणी वाहतुक कोंडी होणार नाही.

या मार्गिकेची लांबी ३८१ मी. इतकी असून रुंदी ७.५ मी. इतकी आहे. या कामासाठी रु.१२.३१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

महानगर आयुक्त यांनी असेही नमुद केले की, उपरोक्त दोन्ही अतिरिक्त मार्गिका देण्याची कामे सध्या प्रगतीपथावर असलेल्या उड्डाणपुलास जोडुनच करावी लागणार असल्याने या उड्डाणपुलाच्या कामाच्या कार्यकक्षेमध्ये त्यांचा अतिरिक्त कामे म्हणुन समावेश करुन कार्यान्वयीत करणे संयुक्तीक ठरेल. त्यानुसार मे.जे.एम.सी. प्रोजेक्ट्स (इं.) लि. यांच्या निविदेत समाविष्ट असलेल्या कामांच्या कार्यकक्षेत वाढ करुन या कामाची एकुण किंमत रु.४८.१८ कोटी इतकी होईल. या व्यतिरिक्त कामाच्या अनुषंगाने होणारी भाववाढ प्रत्यक्ष कामानुसार देय राहील.

८.४ श्री. एन. व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर अतिरिक्त कामे प्रगतीपथावरील पुलाच्या निविदेतूनच करण्याच्या आवश्यकतेबाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, अतिरिक्त मार्गिका प्रगतीपथावरील पुलास मध्यभागी जोडण्यात येणार असल्याने कामांची स्ट्रक्चरल कनेक्टीव्हीटी योग्य प्रकारे होण्यासाठी अतिरिक्त कामे या पुलाच्या निविदेतून करणे संयुक्तिक ठरेल तसेच मार्गिकांच्या कामांसाठी स्वतंत्र निविदा मागविल्यास प्रगतीपथावरील पुलाच्या मध्य भागाचे काम स्थगित ठेवावे लागेल व यामुळे काम पुर्ण होण्यास विलंब होईल.

८.५ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे निदर्शनास आणले की, प्रगतीपथावरील पुलाच्या निविदेची रक्कम रु.२५.२० कोटी असून या रक्कमेत रु.२३.०० कोटी रक्कमेची कामे समाविष्ट करणे योग्य ठरणार नाही. तसेच त्यांनी

..१७/-

श्री.एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांचेकडे विचारणा केली की, मार्गिकांच्या कामासाठी स्वतंत्र निविदा मागवून कामे करणे शक्य होणार नाही का? यावर श्री.एन.व्ही. मिराणी, यांनी सांगितले की, स्वतंत्र निविदा मागवून कामे करणे शक्य आहे. तसेच प्रगतीपथावरील पुलाचे कामास जोडून मार्गिकांसाठी फक्त स्ट्रक्चरल तरतुद करुन उर्वरित कामांसाठी स्वतंत्र निविदा मागविणे अथवा प्रगतीपथावरील पुलाच्या मध्य भागासह अतिरिक्त मार्गिकांसाठी स्वतंत्र निविदा मागविणे या दोन्ही पर्यायांचा अवलंब करता येऊ शकेल.

८.६ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देश दिले की, अतिरिक्त कामांचा प्रगतीपथावरील पुलाच्या निविदेत समावेश करण्यात येऊ नये व सदर कामे श्री. एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सुचविल्यानुसार स्वतंत्र निविदा मागवून करण्यात यावीत. तसेच स्वतंत्र निविदा प्रक्रियेमध्ये सध्या प्रगतीपथावर असलेल्या पुलाच्या कामाचे कंत्राटदारास 'काम नाकारण्याचा प्रथम अधिकार' (First Right of Refusal) देण्यात यावा.

८.७ चर्चेनुसार, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४९:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत भिवंडी शहरातील वंजारपट्टी येथे सुरु असलेल्या उड्डाणपुलाच्या कामात दोन अतिरिक्त मार्गिका उपलब्ध करुन देण्याचे कामाचा समावेश प्रगतीपथावरील पुलाच्या निविदेत करण्यात येऊ नये व सदर कामे स्वतंत्र निविदा मागवून करण्यात यावीत. तसेच स्वतंत्र निविदा प्रक्रियेमध्ये सध्या प्रगतीपथावर असलेल्या पुलाच्या कामाचे कंत्राटदारास 'काम नाकारण्याचा प्रथम अधिकार' (First Right of Refusal) देण्यात यावा.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.९ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) अतिरिक्त कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) कामांना किंमत रु. १४९३.२६ कोटीस प्राधिकरणाच्या दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२० व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ११४८

अन्वये एकुण २१ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यात १२ रस्ते व ९ पुलांच्या समावेश आहे. त्यापैकी ३ रस्त्यांची ४ उड्डाणपुलांची कामे पुर्ण झाली असून, उर्वरीत कामांपैकी ६ रस्त्यांची व ३ पुलांची कामे वेगवेगळया टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विरोधामुळे बोरीवली-गोराई रस्त्यावर गोराई खाडीवर पुलाचे बांधकाम करणे व रस्त्याची सुधारणा करणे, कोपरी पुलाचे बांधकाम व मनोरी-मार्वे रस्त्यावर मनोरीतर खाडीवरील पुलाचे काम स्थगित ठेवले आहे. तसेच डोंबिवली-भिवंडी व डोंबिवली-मुंब्रा रस्त्याच्या कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करण्यात आलेला आहे. त्यानंतर, दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९व्या बैठकीमध्ये ठराव क्र. १२६४ अन्वये अंदाजित किंमत रु. १११३.३५ कोटी रक्कमेच्या ४ रस्त्यांच्या व ५ उड्डाणपुलांच्या अतिरिक्त कामांस प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सदर कामांपैकी ४ रस्त्यांची व ३ उड्डाणपुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत २ उड्डाणपुलांची कामे वेगवेगळया टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत.

९.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या १२०व्या बैठकीत सादर केलेल्या बाब टिप्पणीमध्ये समावेश असलेल्या २१ कामांपैकी मुंब्रा-डोंबिवली जोडरस्ता बांधणे व डोंबिवली-भिवंडी रस्त्याचे बांधकाम करणे या अनुक्रमे रु. ९३.०० कोटी व रु. १६.०० कोटी किंमतीच्या कामाच्या व्याप्तीमध्ये सागरी नियंत्रण क्षेत्रामध्ये बाधित होणारी ७५% जागा, तिवरांची झाडे, दलदलीचे क्षेत्र व पर्यावरण विभागाची मान्यता या बाबी लक्षात घेऊन बदल करणे अत्यावश्यक होते. सदर बाबीकरिता कार्यकारी समितीच्या दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या २३३व्या बैठकीत ठराव क्र. ११९८ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली होती. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांने ५ पर्यायी मार्गांचा अभ्यास करुन प्रकल्पांमध्ये येणा-या विविध अडचणी विचारात घेऊन त्याऐवजी माणकोली-मोटागांव रस्त्याचे काम मोटागांव येथील उल्हास खाडीवरील पुलासहीत बांधकाम करण्याचे काम प्रस्तावित केले आहे व त्या अनुषंगाने होणा-या रु. १८०.०० कोटी रक्कमेचा सुधारीत प्रशासकीय किंमतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. यामुळे डोंबिवली-ठाणे हे १४ कि.मी. अंतराने तर डोंबिवली-भिवंडी हे १५ कि.मी. अंतराने जोडले जाणार आहे. त्यामुळे अस्तित्वातील वाहतुकीचे अंतर अनुक्रमे ७ व ३ कि.मी. ने कमी होणार आहे. या प्रस्तावामुळे मुंब्रा-डोंबिवली हा रेल्वे समांतर रस्ता बांधणेबाबत लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होणारी मागणी पुर्ण होणार आहे.

९.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३२व्या बैठक ठराव क्र. १२९४ अन्वये प्राधिकरणाचा अंदाजित जमा खर्च

दर्शविणारा २०१३-१४ सालचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला होता. त्यामध्ये विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधांतील प्रकल्पांसाठी रु. ७८८ कोटी रकमेची तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुदीमध्ये खालील कामांचा समावेश करणे प्रस्तावित करण्यात आले होते :-

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | टक्का कॉलनी ते पळस्पे फाटा व कळंबोली ते खांदा कॉलनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चे रुंदीकरण व सुधारणा करणे. |
| २. | खोपोली शहर वळण रस्त्याचे दु-पदरीकरण करणे. |
| ३. | भिवंडी शहर वळण रस्ता बांधणे. |
| ४. | कल्याण शहर वळण रस्ता बांधणे. |
| ५. | रा.म. क्र. ४० वरील शिरगांव फाटा ते रा.म.क्र. ३५ वरील बदलापुर जोडणारा रस्ता बांधणे. |
| ६. | नेरळ दस्तुरी रस्त्याची सुधारणा करणे. |
| ७. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशोभिकरण करणे. |
| ८. | रेवस-कारंजा रस्त्यावर रेवसखाडीवर पुल बांधणे. |

वरील कामांपैकी रेवस-कारंजा रस्त्यावर रेवसखाडीवर पुल बांधणेसाठी प्रकल्प सुसाध्यता अहवाल तयार करणेसाठीची तरतुद करण्यात आलेली होती.

९.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, उपरोक्त कामांशिवाय लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार खालील तीन अतिरिक्त कामे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत. सदर कामांसाठी अर्थसंकल्पांमध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

९.४.१ दुर्गाडी येथील अस्तित्वातील २ पदरी पुल वाहतुकीस अपुरा पडत आहे. कल्याण भागातील लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार व वाहन गनती अहवालानुसार दुर्गाडी येथे उल्हास नदीवर चौपदरी पुलाचे बांधकाम प्रस्तावित करण्यात येत आहे.

९.४.२ शिळफाटा ते महापे रस्त्याच्या एकूण ६ कि.मी. लांबी पैकी ४ कि.मी. लांबीचे काम प्रगतीपथावर आहे. वाहतुक विभागाच्या तसेच लोकप्रतिनीधींच्या मागणीनुसार उर्वरीत २ कि.मी. लांबीचे काम एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथील पुलाचे बांधकाम सेवा रस्त्याचे बांधकामासहीत रु. ६९.०० कोटीचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

९.४.३. माथेरान मॉनिटरींग कमिटीने सुचविल्याप्रमाणे दर्शनिय स्थळांची दुरुस्ती व सुशोभिकरण करण्याचे काम महत्वाचे व गरजेचे असल्यामुळे रु. ४७.०० कोटीचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

९.४.४. उपरोक्त कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास्तव सल्लागाराची नियुक्ती कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीत ठराव क्र. १२२६ अन्वये करण्यात आली होती. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने सदरील कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल, सद्यःस्थितीतील वाहनवर्दळ व भविष्यातील वाहनवर्दळ विचारात घेऊन तयार करण्यात आले आहेत.

९.५ बाब टिप्पणीत खालील नमुद केलेल्या १२ कामांच्या अंदाजित खर्चास किंमत रु. १९०४.०० कोटीस प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस देण्याबाबतचा प्रस्ताव महानगर आयुक्त यांनी सादर केला व त्याचा तपशिल बाब टिप्पणीच्या जोडपत्र-१ मध्ये देण्यात आल्याचे नमूद केले :-

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **अंदाजीत किंमत (रुपये कोटी)** |
|---|---|---|
| १. | मानकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हासखाडीवर चौपदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे. | १८०.०० |
| २. | टक्का कॉलनी ते पळस्पे फाटा व कळंबोली ते खांदा कॉलनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चे रुंदीकरण व सुधारणा करणे. | ४७.०० |
| ३. | खोपोली शहर वळण रस्ताचे दुपदरीकरण करणे. | २३.०० |
| ४. | भिवंडी शहर वळण रस्ता बांधणे. | २०१.०० |
| ५. | कल्याण शहर वळण रस्ता बांधणे. | ४४०.० |
| ६. | रा.म. क्र. ४० वरील शिरगांव फाटा ते रा.म.क्र. ३५ वरील बदलापुर जोडणारा रस्ता बांधणे. | ३५०.०० |
| ७. | नेरळ दस्तुरी रस्त्याची सुधारणा करणे. | २७.०० |
| ८. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशोभिकरण करणे. | ४९.०० |
| ९. | रेवस-कारंजा रस्त्यावर रेवसखाडीवर पुल बांधणे. | ४०५.०० |
| १०. | माथेरान येथील दर्शनिय स्थळांची दुरुस्ती व सुशोभिकरण करणे. | ४७.०० |
| ११. | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे चौपदरी पुल बांधणे. | ६६.०० |
| १२. | शिळफाटा-महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे. | ६९.०० |
| | **एकुण १२ कामे** | **१९०४.००** |

उपरोक्त कामांची सविस्तर अंदाजपत्रके, ठाणे व रायगड जिल्हयाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ च्या दरसुचीवर आधारीत असून अंदाजपत्रकामधील एकुण खर्चात सेवावाहिन्या स्थलांतरणाचा खर्च व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या फीचा खर्च समाविष्ट आहे.

९.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्रस्तावित कामांच्या किंमतीत भुसंपादनापोटी अदा करावा लागणारा मोबदला समाविष्ट नाही, कारण सदरील रस्त्यासाठी बहुतांशी जमीन टी.डी.आर. च्या मोबदल्यात घेण्याचा प्रस्ताव आहे. तसेच सद्यःस्थितीमध्ये किती मोबदला अदा

करावा लागणार आहे, हे अनिश्चित असल्यामुळे भुसंपादनाचा अंतिम निवाडा जाहिर झाल्यानंतर स्वतंत्र प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

९.७ महानगर आयुक्त यांनी असेही निदर्शनास आणले की, माणकोली मोटागांव रस्त्याचे बांधकाम व कल्याण वळण रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी पर्यावरण विभागाकडे सि.आर.झेड क्लिअरंससाठी प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. पर्यावरण विभागाने सदरील प्रस्ताव पर्यावरण विभाग, केंद्र सरकार, नवी दिल्ली यांना पाठविले आहेत. सद्य:स्थितीत व भविष्यात येणा-या वाहन वर्दळीचा अभ्यास करुन मोटागांव येथे ४ मार्गिकेचा पुल प्रस्तावित करण्यात आला असून त्याचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच सदरील रस्त्यावरील पुलांसाठी मेरीटाईम बोर्ड यांचीही मान्यता घेण्यात आली आहे.

९.८ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, नेरळ दस्तुरी रस्त्याची सुधारणा करणे व दस्तुरी माथेरान पादचारी मार्गाची सुधारणा व सुशोभिकरण करणेचे प्रस्तावास माथेरान मॉनिटरींग कमिटीने मान्यता दिली आहे, तसेच माथेरान मॉनिटेरींग कमिटीने दर्शनिय स्थळांची दुरुस्ती करण्यास सुचविले आहे. त्याचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट आहे.

९.९ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या, ठाणे व रायगड जिल्हयातील प्रस्तावित विविध उपरोक्त १२ कामांना भुसंपादनाच्या किंमतीव्यतिरीक्त प्रशासकीय मान्यता मिळणेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे शिफारस करण्यासाठी कार्यकारी समितीकडे सादर केला असल्याचे निदर्शनास आणले.

९.१० श्री. एन.व्ही मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, वरील रस्त्यांपैकी कोणत्या रस्त्यांचा समावेश Comprehensive Transportation Study (CTS) मध्ये आहे. तसेच लगतच्या रस्त्यावरील वाहतुकीवर या कामांमुळे कसा परिणाम होणार आहे व वाहतुक अस्तित्वातील रस्त्यावर कशाप्रकारे जोडली जाणार आहे या बाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वरील तक्त्यात नमुद असलेल्या काही कामांचा समावेश CTS मध्ये नाही. परंतु, लोकप्रतिनिधींची मागणी व प्रादेशिकरीत्या महत्वाची कामे असल्याने अंतर्भुत केली आहेत. तसेच महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, अ.क्र. ७, ८ व १० ची कामे माथेरान परिसरातील असून सदर कामे रस्त्यांची नसून सुशोभिकरण स्वरुपाची आहेत व माथेरान मॉनिटरींग कमिटीने या कामांची मागणी केली आहे, त्यामुळे ही कामे समाविष्ट केली आहेत. शिळफाटा या रस्त्याचे काम प्रगतीपथावरील चालू कामांचा उर्वरीत भाग असल्याने समाविष्ट केले आहे.

९.११ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देश दिले की, अ.क्र. १ येथील माणकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हास खाडीवर चौपदरी पुल व रस्त्याचे बांधकाम

करणे या कामाचा CTS मध्ये समावेश नसल्याने तसेच अ.क्र. ११ येथील कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे चौपदरी पुल बांधणे या कामाचा समावेश सन २०१३-१४ सालच्या मंजूर अर्थसंकल्पात नसल्याने या दोन्ही कामांचे कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीमध्ये सादरीकरण करण्यात यावे व त्यानंतरच या कामांबाबत निर्णय घेण्यात येईल.

९.१२ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असेही निदर्शनास आणले की, विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा अंतर्गत यापुर्वी मंजूर असलेल्या सर्व कामांच्या प्रगतीचा आढावा कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

९.१३ चर्चेनुसार, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२५०:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम, (३) चे पोटकलम (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या, ठाणे व रायगड जिल्हयातील प्रस्तावित विविध विकास कामे प्राधिकरणाकडून करण्याच्या रु. १९०४.०० कोटी अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठीच्या प्रस्तावात खालील प्रमाणे बदल करुन रु. १६५८ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यतेची शिफारस करीत आहे. सदरील कामांचा समावेश विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत करण्यास मान्यता देण्यात येत आहे, तसेच उपरोक्त कामांवर प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत किंमत (रुपये कोटी) |
|---|---|---|
| १. | टक्का कॉलनी ते पळस्पे फाटा व कळंबोली ते खांदा कॉलनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चे रुंदीकरण व सुधारणा करणे. | ४७.०० |
| २. | खोपोली शहर वळण रस्ताचे दुपदरीकरण करणे. | २३.०० |
| ३. | भिवंडी शहर वळण रस्ता बांधणे. | २०१.०० |
| ४. | कल्याण शहर वळण रस्ता बांधणे. | ४४०.० |
| ५. | रा.म. क्र. ४० वरील शिरगांव फाटा ते रा.म.क्र. ३५ वरील बदलापुर जोडणारा रस्ता बांधणे. | ३५०.०० |
| ६. | नेरळ दस्तुरी रस्त्याची सुधारणा करणे. | २७.०० |
| ७. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशोभिकरण करणे. | ४९.०० |
| ८. | रेवस-कारंजा रस्त्यावर रेवसखाडीवर पुल बांधणे. | ४०५.०० |
| ९. | माथेरान येथील दर्शनिय स्थळांची दुरुस्ती व सुशोभिकरण करणे. | ४७.०० |
| १०. | शिळफाटा-महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे. | ६९.०० |
| | **एकुण १० कामे** | **१६५८.००** |

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.१० : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ जून, २०१३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३**

दिनांक ०१ जून, २०१३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका/वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीची माहिती महानगर आयुक्त यांनी समितीपुढे सादर केली. त्यानंतर, सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**पटल बाब क्र.१ : मरीन ड्राईव्ह परिसराच्या टप्पा-२ च्या पुनर्नूतनीकरणाच्या प्रकल्पासंबंधी संकल्पचित्र व देखरेख (Design and supervision Consultant-DSC) तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (Project Management Consultant - PMC) नेमणूक करणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००४ रोजी झालेल्या २०९ व्या बैठकीमधील ठराव क्र. ९२७ अन्वये श्री.रतन बाटली बॉय (ARC- CGL Consultant Pvt.Ltd.) या कंपनीला मरीन ड्राईव्ह परीसराची टप्पा-१ च्या पुनर्नूतनीकरणाच्या संकल्पचित्र व देखरेख या कामासंबंधी प्रकल्प खर्चाच्या १.०% फी तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) या कामासाठी प्रकल्प खर्चाच्या २.५% इतकी फी देण्यासंबंधीचा ठराव मंजूर झाला आहे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी एप्रिल, २०१३ रोजी मरीन ड्राईव्ह प्रकल्पास वाहतूक पोलिस, प्राधिकरण, सल्लागार, बेस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका इ. अधिका-यांसोबत भेट दिली व टप्पा-१ मधील उर्वरित कामांचा आढावा घेतला तसेच नव्याने काही कामे सुचविली. टप्पा-१ मधील उर्वरित कामे तसेच काही नवी कामे अंतर्भूत करुन टप्पा-२ चे काम प्राधिकरणाने करावे अशा सूचना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिल्या आहेत.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केल्याप्रमाणे पूर्ण करावयाच्या कामासंबंधी संकल्पचित्र व देखरेख करण्यासाठी संबंधित सल्लागाराची नेमणूक करणे गरजेचे असल्याने व श्री.रतन बाटली बॉय (ARC

. ..२४/-

- CGL Consultant Pvt.Ltd.) यांनी टप्पा-१ मध्ये चांगल्या दर्जाचे काम केले असल्याने टप्पा-१ प्रमाणे त्यांनी टप्पा-२ मध्ये देखील त्याच अटी व शर्तीवर नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचाराधिन होता.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सल्लागार श्री.रतन बाटली बॉय (ARC - CGL Consultant Pvt.Ltd.) यांनी जून, २०१३च्या प्रस्तावाप्रमाणे संकल्पचित्र व देखरेखीसाठी प्रकल्प खर्चाच्या ४.०% व प्रकल्प व्यवस्थापनासाठी ३.५% अशी मागणी केली होती व यामध्ये प्रकल्प खर्च हा अंदाजित रुपये ६०.०० कोटी दर्शविण्यात आला होता. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सल्लागाराने सप्टेंबर, २०१३ च्या आपल्या दुस-या प्रस्तावात संकल्पचित्र व देखरेखीसाठी ४.६६% फी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी ५.००% अशी फी ची मागणी केली व यामध्ये प्रकल्प खर्च हा अंदाजित रुपये ७८.२४ कोटी दर्शविण्यात आला होता.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, वरील प्रस्तावामध्ये सादर केलेल्या सल्लागाराची फी ही जास्त वाटत असल्याने सल्लागारासोबत ऑक्टोबर, २०१३ मध्ये प्राधिकरणाने चर्चा केली व सल्लागाराने फी कमी करावी असे सूचित केले व त्यानंतर दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३ च्या प्रस्तावान्वये सल्लागाराने संकल्पचित्र व देखरेख (DSC) साठी २.०% व प्रकल्प व्यवस्थापनासाठी २.५% अशी फी आकारण्यास सहमती दर्शविली व प्रकल्प खर्च हा अंदाजे रुपये ७८.२४ कोटी असा दर्शविला आहे. त्यानुसार सल्लागाराकडून स्विकृतीपत्र घेण्यात येईल.

महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, सल्लागाराने नोव्हेंबर, २०१३ मध्ये दिलेला प्रस्ताव व टप्पा-१ मधील त्यांनी आकारलेली फी याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| **बाब** | **टप्पा-१** | **टप्पा-२ प्रस्तावित** |
|---|---|---|
| प्रकल्प खर्च | अंदाजीत रु. ३० कोटी | अंदाजीत रु. ७८.२४ कोटी |
| संकल्पचित्र व देखरेख सल्लागार फी (Design and Supervision Consultant- DSC)% on cost put to tender | १.०० % | २.०० % |
| प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी (Project Management Consultant - PMC) % on cost put to tender | २.५ % | २.५ % |

महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, वरील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे संकल्पचित्र व देखरेखीसंबंधी टप्पा-२ मध्ये सल्लागाराने २.०% फी ची मागणी केली असून टप्पा-१ मध्ये ही फी १.००% होती. प्रकल्प खर्चामध्ये झालेली वाढ आणि मनुष्यबळाचा वाढीव दराची तुलना करता वरिल वाढ ही संयुक्तिक वाटते. तसेच टप्पा-१ मधील उर्वरित कामे व टप्पा-२

..२५/-

मधील नविन कामे ही टप्पा-१ मधील कामाशी संलग्न असल्याने नविन निविदा मागविण्यापेक्षा टप्पा-१ मधील सल्लागाराची नेमणूक करणे हे प्रकल्पाच्या दृष्टीने संयुक्तिक वाटते व म्हणूनच टप्पा-१ सल्लागाराचा टप्पा-२ साठी देखील वरील दराप्रमाणे विचार करण्यात यावे असे कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२५१:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मरीन ड्राईव्ह पुनर्नूतनीकरणाच्या टप्पा-२ च्या प्रकल्पासाठी श्री. रतन बाटली बॉय यांनी स्थापन केलेल्या कंपनीस (ARC - CGL Consultant Pvt.Ltd.) प्रकल्प खर्चाच्या (Cost put to Tender) २.०० % फी वर संकल्पचित्र व देखरेख (DSC) कामांसाठी व प्रकल्प खर्चाच्या (Cost Put to Tender) २.५% फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) कामासाठी नेमणूक करण्यास व एक मात्र स्त्रोत याव्दारे तसेच टप्पा-१ मधील करारनाम्यातील नमूद केलेल्या अटीं व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पामध्ये जरी प्रकल्प अंमलबजावणीसाठी भिन्न संस्था असल्या तरी प्राधिकरणाने सल्लागाराची बाब टिप्पणीच्या जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेल्या सर्व कामांसाठी वरीलप्रमाणे नेमणूक करण्यास व त्या संबंधित फी सल्लागारास वरील ठरावाप्रमाणे अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागाराने स्थापन केलेली कंपनी म्हणजेच ARC - CGL Consultant Pvt.Ltd. सोबत वरील कामासंबंधात करारनामा करण्यास तसेच टप्पा-१ मधील वरील कामासंबंधी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये योग्य ते बदल करण्यास तसेच प्रकल्पाची जलदगतीने अंमलबजावणी करण्यास आवश्यक असलेली पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

-------------xox-------------